| | |
|---|---|
| MHJN020002332024 | नि.दि.वा.क्र.३९/२०२४<br>ताराबाई व ईतर–वि–शासन व ईतर |

**निशाणी क्र.३३ वरील आदेश**

**(दि.१६.०३.२०२६ रोजी पारीत)**

. प्रस्तुत प्रकरणातील मुळ प्रतिवादी क्र.७–बाबुराव नागोजी सतकर यांचे दि.०६.०६.२०२५ रोजी निधन झाल्यामुळे त्यांचे कायदेशीर वारसांना अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळण्यासाठी सदर अर्ज दाखल केलेला आहे.

**वादीचे वारसांचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–**

२. मुळ प्रतिवादी क्र.७–बाबुराव नागोजी सतकर यांचे दि. ०६.०६.२०२५ रोजी निधन झालेले असून त्यांचे कायदेशीर वारस नामे मन्साराम बाबुराव सतकर,वय ५२ वर्ष,शिवराम बाबुराव सतकर,वय ४० वर्ष आणि लक्ष्मीबाई बाबुराव सतकर,वय ६५ वर्ष यांना मुळ दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. मयतास सदरहु वारसांव्यतिरीक्त ईतर कोणीही वारस नाहीत. करीता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. प्रतिवादी क्र.७ यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे सादर केले. प्रस्तुतचा अर्ज मुदतीत नसल्यामुळे फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादी क्र.१ ते ६ व ८ यांनी प्रस्तुत अर्जावर लेखी म्हणणे सादर न केल्यामुळे त्यांचे विरुध्द् सदरहु अर्ज एकतर्फा चालविण्यात आला.

५. अभिलेखावरील दस्तऐवज आणि लेखी म्हणणे याचे अवलोकन केले.

६. वादी आणि प्रतिवादी क्र.७ यांचे तर्फे विधिज्ञांचा मौखीक युक्तीवाद ऐकला.

७. वादी यांनी विशेष मदतीचा कायदा,कलम ३८ अन्वये अप्पर जिल्हाधिकारी यांनी प्र.क्र.२०२३/आरबी/अपिल/सीआर–१०६ मध्ये दि. १५.०९.२०२३ रोजी पारित केलेला आदेश वादीवर बंधनकारक नाही असे घोषीत करणे आणि कायमचा मनाई हुकूम मिळण्यासाठी सदरचा दावा दाखल केलेला आहे. सदरहु तथाकथित आदेश वादीवर बंधनकारक आहे किंवा नाही, तसेच वाद मिळकतीचे मुळ वारस कोण आहेत हया बाबी साक्षीपुराव्याचा भाग आहे. आजच्या टप्प्यावर मुळ प्रतिवादी क्र.७–बाबुराव नागोजी सतकर यांचे दि. ०६.०६.२०२५ रोजी निधन झाल्यामुळे त्यांच्या वारसांना अभिलेखात समाविष्ट करणे आवश्यक आहे. प्रस्तुत दाव्यात प्रस्तावित वारसांना समाविष्ट केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होण्याची शक्यता नाही. याउलट सदरहु वारसांना अभिलेखात समाविष्ट केल्यास वाद मिळकतीबाबत निश्चितच महत्वाच्या बाबी

अभिलेखावर येण्यास मदतच होईल. एकंदरीत अंतिम न्यायनिर्णयावेळी काही तांत्रीक मुद्ये राहू नये आणि सदरचा दावा कायदेशीररित्या गुणदोषावर निकाली काढण्याच्या दुष्टीने प्रस्तुत अर्ज खर्च रक्कम रु.५००/–भरणा करण्याच्या अटीवर मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता वादीचा नि.क्र.३३ वरील अर्ज मंजूर करण्यास पात्र ठरतो. करीता पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

## आदेश

| | |
|---|---|
| १ | वादी यांनी दाखल केलेला नि.क्र.३३ वरील अर्ज खर्च रक्कम रु.५००/–जिल्हा विधि सेवा प्राधिकरण,जालना या कार्यालयात भरणा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. |
| २ | मुळ प्रतिवादी क्र.७–बाबुराव नागोजी सतकर यांचे दि. ०६.०६.२०२५ रोजी निधन झाल्यामुळे त्यांचे कायदेशीर वारसांना अभिलेखामध्ये समाविष्ट करण्याची परवानगी मंजूर करण्यात येते. |
| ३ | मुळ प्रतिवादी क्र.७–बाबुराव नागोजी सतकर यांचे वारसांना विहित मुदतीत अभिलेखामध्ये समाविष्ट करण्यात येऊन सुधारित दाव्याची प्रत दाखल करावी. |

ASHVINI PRAVIN DIWAN

Digitally signed by ASHVINI PRAVIN DIWAN
Date: 2026.03.16 17:12:55 +0530

(अश्वीनी प्र. दिवाण)

दि.१६.०३.२०२६

दिवाणी न्यायाधीश(व.स्तर)

जालना

**प्रमाणपत्र**

निवेदन करण्यात येते की,पी.डी.एफ.फाईल मधील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :–शिरीष दि.देशमुख

न्यायालयाचे नाव :–दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), जालना

पी.डी.एफ.दिनांक :–दि.१६.०३.२०२६

लघुलेखक(म.)